*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT /Vol. XI / Issue – II* *ISSN 2277-8063*

# बदलती प्रसारमाध्यमे व लोकशाही

**श्रीमती.सोनाली चंद्रकांत पटेकर,** सहाय्यक प्राध्यापक, राजे रामराव महाविद्यालय जत, ता.जत जिल्हा सांगली. मोबाईल नंबर -७०३८७६२३६०.

---

**प्रस्तावना-**

प्राचीन काळापासून माध्यमांचा प्रभाव समाजात आहे. पारंपारिक आणि आधुनिक माध्यमे समाजाच्या विकास प्रक्रियेशी संबंधित आहेत. माध्यमांचे प्रेक्षक गट विखुरलेले आहेत. त्याचे संदेश निसर्गातही अस्थिर असतात. मग हे माध्यम आहे जे संप्रेषण प्रक्रियेला शेवटपर्यंत घेऊन जाते. संदेशाच्या प्रवाहात वापरले जाणारे माध्यम. संप्रेषण माध्यमांच्या विकासामागील मुख्य कारण म्हणजे माणसाची कुतूहल सध्याच्या काळात माध्यमे आणि समाज यांच्यात एक खोल नाते आणि जवळीक आहे. याद्वारे सामान्य जनतेचे हित आणि हितसंबंध स्पष्ट केले जातात. माध्यमांनी माहिती सर्वांना उपलब्ध करून दिली आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे माध्यमे देखील विकसित झाली आहेत आणि या संवादामुळे एक जागतिक घटना बनली आहे.

लोकशाहीचा प्रमुख आधारस्तंभ असणाऱ्या प्रसार माध्यमामध्ये 'कालाय तस्मै नमः' म्हणतात त्याप्रमाणे बदल झाले. त्यांच्या स्वरूपात आणि गुणवत्तेतही! सुरुवातीला वर्तमानपत्र, रेडिओनंतर, दूरचित्रवाणी अशी रूप धारण केली गेली आणि गुणवत्ता! प्रथम वैचारिक पातळीवर विहार करणारी ही माध्यमे मनोरंजनाचे साधन होऊ पाहत आहेत.
तरुणांना आपले आदर्श बदलावयास लावणारी ही प्रसारमाध्यमे खरेच लोकशाहीचा आधार स्तंभ आहेत का? पण शंभर कौरवांच्या गर्दीत पाच पांडव असतातच ! त्या प्रमाणे या प्रसारमाध्यमांची काही चांगली कामेही आहेत

जनमत तयार करण्यापासून तर जनतेचा आवाज सत्ताधारी शासनापर्यंत पोहचविण्याचे काम प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून केले जाते ज्यामुळे लोकशाही बळकट होण्यास मदत होते. प्रसारमाध्यमांचे लोकशाही व्यवस्थेमध्ये त्रिकालाबाधित महत्व कुणीही नाकारू शकत नाही. नागरिकांचे सार्वभौमत्व अबाधित ठेऊन लोकशाही व्यवस्था जिवंत ठेवण्याचे महत्कार्य प्रसारमाध्यमांना करावे लागते. इलेक्ट्रोनिक प्रसारमाध्यमांनी १९९० च्या दशकापासून लोकशाहीमध्ये आपले स्थान बळकट केले आहे.

**प्रसारमाध्यमांचा इतिहास -**

पूर्वीच्या काळात आजच्या सारखी प्रसारमाध्यमे नव्हती. राजाला एखादी बातमी किंवा आदेश लोकांपर्यंत पोहचवायचाअसेलतर राजाचे लोकगावोगावी दवंडी पिटवत असत.एखादी बातमी एकाकडून दुसऱ्याला आणि दुसऱ्याकडून तिसऱ्याला असा प्रवास करीत ती बातमी सर्वत्र पसरत असे. भारतात इंग्रजांचे आगमन झाल्यावर मुद्रणकला, वर्तमानपत्रे सुरु झाली. वर्तमानपत्रांमुळे छापील बातमी सर्वत्र पोहचण्यास मदत होऊ लागली.

**स्वातंत्र्यापूर्वीची प्रसारमाध्यमे -**

स्वातंत्र्यापूर्वी जुलमी पद्धतीने शासन करणाऱ्या इंग्रजांविरुद्ध आवाज उठवण्यासाठीप्रसारमाध्यमांचे स्थान देशभक्तांनी लेखणीचा वापर केला.त्यावेळी आपल्या लेखणीतून अनेक क्रांतिवीरजन्माला आले.इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्तता मिळविण्यासाठी लेखणीतून आणि नेत्यांच्या भाषणातून प्रवृत्त होऊन जनता इंग्रजांविरुद्ध लढा देत होतीत्यावेळी लोकांपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी वृत्तपत्र आणि नेत्यांची भाषणे हीच माध्यमे होती. अर्थात, स्वातंत्र्यापूर्वी वृत्तपत्रे आणि भाषणे केवळ ही दोनच सशक्त प्रसारमाध्यमे होती. मात्र देशाच्या स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधी यांनी आकाशवाणी केंद्राला १२ नोव्हेंबर १९४७ला पहिल्यांदा भेट दिली आणि तेथूनच त्यांनी शांतता राखण्याचे आवाहन केले होते. त्या दिवसापासून १२ नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस म्हणून साजरा केला जातो.

**स्वातंत्र्यानंतरच्या प्रसारमाध्यमांचे स्वरूप** -

स्वातंत्र्यानंतर आकाशवाणीला हळूहळू महत्त्व प्राप्त होऊ लागले. त्यानंतर दूरदर्शन अस्तित्वात आले. देशभरातील लोकांना दूरदर्शनचे आकर्षण वाटू लागले आजूबाजूच्या घडामोडींचे प्रत्यक्ष हलते चित्र दूरदर्शनवर दाखवण्यात येऊ लागले त्यामुळे त्या काळात दूरदर्शन हे प्रसारमाध्यमाचे जास्तीत जास्त प्रभावी माध्यम ठरले. घडलेली घटना काही काळानंतर दूरदर्शनवर प्रसारित करून लोकांना दाखवण्यात येत होती. मात्र १९९०च्या जागतिकीकरणानंतर माध्यम क्षेत्रामध्ये मोठेबदल घडून आले. तंत्रज्ञान, दळणवळणाची सोय यामुळे बातम्यांचे प्रसारण जलद गतीने होऊ लागले. देशभरात काय घडते आहे, याची उत्सुकता लोकांना अधिक जाणवू लागल्यामुळे दूरदर्शन बघण्यासाठी लोक तासन् तास टीव्हीसमोर बसून असल्याचे त्या वेळी पाहावयास मिळत होते.

**सद्याची प्रसारमाध्यमे-**

सध्या माहितीचे आणि संदेशाचे वहन इतके जलदगतीने होत आहे की १ सेकंदापूर्वी, २ मिनिटांपूर्वी काय घडले याच्या अपडेट्स ट्विटर किंवा फेसबुक किंवा व्हॉट्सअॅप यांसारख्या सोशल साईट्सवरून त्वरित प्रसारित होत असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संदेशवहनाचे प्रमाण सध्या झटपट होताना दिसत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेल्या संदेशवहनाच्या प्रसारणाची जागा जरी आजच्या फेसबुक व्हॉट्सअॅपने घेतली असली तरी देखील आजही पुरातन माध्यमांनी त्याच जोशात तग धरला आहे. माध्यमांचा वापर दिवसेंदिवस वाढत असून वृत्तपत्र आणि माध्यमांची जागा फेसबुक आणि व्हॉट्सअॅपने घेतली आहे.

**प्रसारमाध्यमांची आवश्यकता-**

प्रसारमाध्यमांमुळे मनोरंजन होते तसेच लोकांना घटना प्रत्यक्ष पाहायला मिळतात. माहितीची देवाणघेवाण सोपी होते. तसेच शैक्षणिक, व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक असणारी माहिती ग्रामीण व दुर्गम भागापर्यंत पोहचवली जाते. समाज्यात काय घडते आहे,

हे लोकांना माहिती होण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता आहे. प्रसारमाध्यमामुळे लोकशाही अधिक सुद्दढ होण्यास मदत होते. म्हणून प्रसारमाध्यमे महत्वाची आहेत.

प्रसारमाध्यमांमुळे दैनंदिन घटनांची माहिती लोकांपर्यंत पोहचविता येते. विविध क्षेत्रातील माहितीमिळते. सामाजिक समस्या मांडून लोकानमध्ये जागृतीकरता येते. अन्यायाला विरोध करून लोकशाही बळकट करता येते, जगभरातील घडामोडींची माहिती क्षणार्धात उपलब्ध होते. माहितीची देवाणघेवाण करणे सुलभ होते. माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरवण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते. आजच्या काळात प्रसारमाध्यमांना अनन्य साधारण महत्व आहे. त्यामध्ये वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, ट्विटर, फेसबुक किंवा व्हॉट्सॲप, इत्यादी प्रसारमाध्यमांचा उल्लेख करता येईल.

**बदलती प्रसारमाध्यमे व लोकशाही**

आजच्या नव्या व्यवस्थेत भारतीय माध्यमे खासकरून इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका महत्वाची आहे. गेल्या काही वर्षांपासून दूरचित्रवाणीवरील बातम्यांमध्ये निपक्षपातीपणा आणि नैसर्गिकता यांचा आभाव होत असल्याचे दिसू लागल्याचे आदर्श दूरचित्रवाणीच्या गुरू आणि पुढाकार करणाऱ्यांना जाणवू लागले आहे. आदर्श पध्दतीने बातमीदारी देणे कंटाळवाणे आणि कमी प्रतिचे मानले जाऊ लागले असून निरुत्साहीपणाचे समजले जात आहे. तसेच आदर्श पत्रकारिता संपादकीत पानांवरून किंवा मत व्यक्त करणा-या सदरांमधूनही नामशेष होत चालली आहे. पत्रकारितेच्या नितीमुल्यांचा बळी टिआरपी मिळविण्याच्या स्पर्धेमुळे दिला जात असल्याचे जाणवू लागले आहे. गतीमानता हाच आजच्या पत्रकारितेचा नवा मंत्र झाला आहे त्यामुळे घटनांची पडताळणी आणि फेरपडताळणी करणे हा मुद्दा मागे पडला आहे. बातम्या या लाईव्ह घटना कशा दिसतील याची स्पर्धा लागली आहे. प्रत्येक क्षणाच्या घटनेत नव्या बातम्या दिल्या जात आहेत. त्यातही विसंगती दिसत आहेत. ज्या बातम्यांमुळे लोकांचे लक्ष वेधले जाईल अशा बातम्या देण्याची लगबग सुरू झाली आहे. ही लगबग इतकी टोकाला जाऊ लागली आहे की, कधीकधी त्यातून मूळ बातमी किंवा घटना दूर राहते आणि नविनच काहीतरी पुढे येत असते.

२१ व्या शतकातील आजचा समाज हा माहितीप्रधान समाज आहे.समाज जसजसा विकसित होतगेला तसतशी समाजमाध्यमे, साधने लोकप्रिय आणि विकसित होत गेली . लोकांकडून समाज माध्यमांपर्यंतचा हा प्रवास झालेला असला तरी त्यातील सर्व प्रकारच्या माध्यमांतील उद्देश हा केवळ उदरनिर्वाह हा नसून प्रबोधन हाही असतो असे नमूद करता येईल. ट्विटर, इंस्टाग्राम, फेसबुक, व्हाटसअप, युट्यूब आदी नवीन माध्यमांचा उल्लेख करता येईल लोकशाही, राजकारण आणि माध्यमे या एका अर्थाने स्वतंत्र आणि तरीही परस्परावलंबी शाखांच्या संबंधांचा आहे.

आज मिडिया नावाचे क्षेत्र उद्योगपती आणि भांडवलदार वर्गाने बळकावलेले आहे हे देशातल्या नागरिकांपासून लपून राहिलेले नाही. समाज्यामध्ये घडत आसलेल्या घटना जनतेसमोर आणण्यात प्रसारमाध्यमांचा मोठा वाटा आहे. प्रसारमाध्यमांमुळे लक्षावधी

लोकांशी संपर्क साधने शक्य झाले आहे. गेल्याकाही वर्षात सोशल मिडीयाने मुख्य प्रवाहातील माध्यमांची मोठी जागा व्यापली असून, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्र आणि इतरमाध्यमांना मागे टाकत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**लोकशाहीचा प्रसारमाध्यमे स्तंभ**

माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, हे जगभरातील लोकशाही देशांनी स्वीकारलेले वास्तव आहे. ब्रिटनच्या संसदेत या संकल्पनेचा जन्म झाला. संसद, प्रशासन, दुबळी होईल, असे मानले जाते. त्यातही माध्यमे हा स्तंभ अधिक मजबूत असला पाहिजे, असे लोकशाही व्यवस्था मानते. कारण लोकशाहीचे पहिले तीन स्तंभ आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावण्याची मोठी जबाबदारी माध्यमांवर असते. देशातील वा जगभरातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि समाजजीवनाशी निगडित असलेल्या प्रत्येक घडामोडीचे भान समाजास देण्याची जबाबदारी माध्यमांवर असते, आणि ही जबाबदारी निभावणे हे व्रत आहे, हे माध्यमांनी स्वत:हून मान्य केले असेल, तर जे काही समाजापर्यंत पोहोचवायचे असते, ते निखळपणे व जसे आहे तसे, त्याला कोणताही रंग न लावता पोहोचविणे हे माध्यमांचे कर्तव्य ठरते.

माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असला, तरी अलीकडे नव्याने विस्तारत असलेल्या समाजमाध्यमांना या जबाबदारीचे पुरेसे भान येणे गरजेचे आहे. समाजमाध्यमांचा समाजविघातक कामांसाठी गैरवापर होत असल्याच्या असंख्य बातम्या माध्यमांतूनच समाजापर्यंत पोहोचत असतात. लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ म्हणून ज्या जबाबदाऱ्या माध्यमांवर असतात, त्यांचे पालन केल्याचे पुण्य माध्यमांना प्राप्त होईल. कारण, त्याच अपेक्षेने समाज माध्यमांकडे आजही पाहत आहे.

समाजाच्या माध्यमांकडून असलेल्या अपेक्षा आजही जिवंत आहेत. माध्यमांवरील समाजाचा विश्वास आजही कायम आहे. अधूनमधून दाटणारे संशयाचे ढग बाजूला करून लोकशाहीकडून असलेल्या अपेक्षांचे भान कायम राखले, तर माध्यमांचे समाजमनातील स्थान कधीच ढळणार नाही, हे स्पष्ट आहे. लोकशाहीच्या बळकटीसाठी माध्यमांनी विश्वासार्हता जपली पाहिजे. हे समाजभान राखले तर माध्यमांचे समाजातील स्थान अधिक बळकट होईल.

**संदर्भ ग्रंथ -**

१) राजकारण आणि माध्यमे. लेखक -डॉ.बाळ ज.बोठे पाटील विश्वकर्मा प्रकाशन,पुणे

२) आधुनिक माध्यमांची भूमिका व जबाबदारी-वाय एस मराठी टीम आशुतोष वरिष्ठ पत्रकार

३) प्रसार माध्यमे आणि इतिहास. भाग १ (इयत्ता१० वी)

४) प्रसारमाध्यमे संचालित लोकशाही. डॉ.संदीप नंदेश्वर नागपूर यांचा लेख २०१४